जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
ईमेल :- cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र. ९८१९२०८२७९

प्रेस नोट **दि.१२/०७/२०२५**

‘फ्लिपकार्ट कंपनी कडुन कालबाहय (Expiry Date) अन्नधान्य, कडधान्य, खाद्यपदार्थ, कॉस्मेटिक व सॅनेटरी प्रोडक्ट्स नाश करण्यासाठी आल्यावर त्याचा नाश न करता तो माल सुट्टा करून बाजारात विक्री करणाऱ्या इकोस्टार रिसायकलिंग कंपनीचा पर्दाफाश’

‘‘ गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे ची कामगिरी ’’

दि. ०९/०७/२०२५ रोजी प्राप्त गोपनीय माहिती नुसार ‘‘ **फ्लिपकार्ट कंपनी** कडुन कालबाहय (Exipry Date) असलेले सर्व प्रकारचे कडधान्ये त्यांच्या डाळी, आटा, ड्रायफ्रुटस्, साखर, तसेच चॉकलेट, कॉस्मेटिक, सॅनेटरी प्रॉडक्ट्स असा माल दहिसर नाका, शिळ-डायघर, ठाणे येथील **‘‘इको स्टार रिसायकलिंग’’** या कंपनीत नाश करण्यासाठी पाठविला असताना सदरचा माल नाश न करता त्या मालाची बेकायदेशीररित्या खुल्या बाजारामध्ये विक्री केली जाते.’’ अशी बातमी मिळाली होती.

नमुद बातमीच्या अनुषंगाने मा. वरिष्ठांच्या आदेशान्वये गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड, पोलीस अधिकारी व अंमलदार आणि अन्न सुरक्षा अधिकारी यांनी कायदेशीर प्रक्रीयेचा अवलंब करून, इको स्टार रिसायकलिंग ॲण्ड इ वेस्ट रिसायकलिंग कंपनीचे आरिफ कंपाऊंड, गोडाऊन नं. ६, बॅंक बडोदा जवळ, जुना मुंब्रा पुणे रोड, दहीसर नाका, ठाणे या ५३,००० चौरस फुट क्षेत्रफळाचे गोडावुन आणि गरीब नवाज इस्टेट, फॅक्टरी नं. ६४२, सर्वे नं. ८, हिस्सा नंबर २/ए, पनवेल रोड, दहीसर, ठाणे या ३१,००० चौरस फुट क्षेत्रफळाचे गोडावुन मध्ये छापामारी करून दि. ०९/०७/२०२५ रोजी २३:३५ वा. ते दि. १०/०७/२०२५ रोजी दुपारी १२:०० वा. पावेतो सलग दोन्ही गोडावुन मध्ये तपासणी केली असता त्याठिकाणी फ्लिपकार्ट कंपनीकडुन नाश करण्यासाठी पाठविण्यात आलेला कालबाहय (Expiry Date) झालेले सर्व प्रकारचे अन्नधान्य, कडधान्य, विविध कंपन्यांचा आटा (पीठ), साखर, तांदुळ, सर्व प्रकारचे ड्रायफ्रुट्स, टॉयलेट क्लिनर, सॅनेटरी पॅड, वॉशिंग पावडर, साबण असा अंदाजे २०० टन माल नाश न करता नमुद मालाच्या मुळ कंपनीचे आवरण फाडुन त्यातील अंदाजे १२,००० किलो (१२ टन) वजनाचा असा सु’’ ३०,००,०००/- किं.चा माल सुट्टा करून तो साध्या प्लॅस्टीकच्या पारदर्शक पिशव्यांमध्ये व गोण्यांमध्ये विक्री करीता साठा करून ठेवल्याचे आणि नवकार रिसायकलिंग दहिसर मोरी, शिळ-डायघर, ठाणे या कंपनीचे बनावट डिलेव्हरी चलन तयार करून त्या डिलेव्हरी चलनाचा वापर माल वाहतुक करणाऱ्या ड्रायव्हर करवी भिवंडी व इतर परिसरात विक्री करीत असल्याचे आढळुन आले आहे.

इको स्टार रिसायकलिंग ॲण्ड ई-वेस्ट रिसायकलिंग कंपनीचे दोन्ही गोडावुन मधुन मालक मोहंमद इरफान मोहमंद मुनीर चौधरी, वय-४१ वर्षे, व्यवसाय, रा.ठि. रुम नं. १, महेंद्र सिंग चाळ, ॲन्थोनी चर्च जवळ, खैरानी रोड, साकीनाका, मुंबई नं. ७२ व मोहम्मद अक्रम मोहम्मद इस्माईल शेख, वय-५८ वर्षे, रा-घर नं ७५४, इस्माईल मंजिल अयुब अन्सारी मस्जिदजवळ, गौरीपाडा, भिवंडी जि. ठाणे यांच्या विरुध्द् दि. १०/०७/२०२५ रोजी १४:०३ वा. शिळ-डायघर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नं. ७३४/२०२५ भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम ३१८(४),३३६(२),३३६(३), ३४०(२), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. नमुद गुन्हयात त्यांना दि. १०/०७/२०२५ रोजी ०५:०५ वा. अटक करण्यात आलेली असून नमुद आरोपींना दि. १४/०७/२०२५ रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड मिळालेली आहे. दाखल गुन्हयात इतर कोणाचा सहभाग आहे अगर कसे? याबाबत तपास सुरू आहे.

वर नमुद गुन्हयाचा पुढील अधिक सखोल तपास गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे हे करीत आहेत.